पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग कार्यालय

# कार्यपत्रिका क्र. १०

## सभावृत्तांत

दिनांक : १३/११/२०१३ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे नोव्हेंबर २०१३ ची मासिक सभा बुधवार दिनांक १३/११/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता अ प्रभाग कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित करण्यात आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. जावेद रमजान शेख - अध्यक्ष
२) मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३) मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस के बापू
४) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५) मा.सौ.स्वाती प्रमोद साने
६) मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७) मा.सायकर अजय शंकरराव
८) मा. सौ.जाधव साधना रामदास
९) मा. जाधव राहूल गुलाब
१०) मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
११) मा. सौ. पवार संगीता शाम
१२) मा.सौ. उबाळे सुलभा रामभाऊ
१३) मा.सौ.बोऱ्हाडे शुभांगी संजय
१४) मा. मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
१५) मा.सौ.(चिखले) मराठे अश्विनी अजित
१६) मा. सौ. भारती फरांदे
१७) मा.आर.एस.कुमार
१८) मा.सौ.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
१९) मा. पांढरकर निलेश शंकरराव
२०) मा.अविनाश (दादा) टेकवडे
२१) मा. सौ.काळभोर वैशाली जालिंदर

याशिवाय मा.श्री.ज्ञानेश्वर ढेरे, प्रभाग अधिकारी, मा.आय.वाय.सय्यद, कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.श्री.चव्हाण एस.एस., कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.लियाकत पिरजादे, कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्रीम. रेखा गाडेकर, प्रशासन अधिकारी, मा.श्री.पी.जी.जाधव, लेखाधिकारी, मा.श्री.के.डी.दरवडे, सहा.आरोग्याधिकारी, मा.श्री.एकनाथ ढवळे, उपअभियंता(जल नि:सारण), मा.श्री.सुनिल वाघुंडे, मा.श्री.राजेंद्र राणे, उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.शितोळे एस.के., कनिष्ठअभियंता (झो.नि.पु.), श्री.सी.सी.मोर, हॉर्टीकल्चर पर्यवेक्षक, इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

मा.अध्यक्ष यांनी उपस्थित सन्माननिय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

अ) दिनांक ०९/१०/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता घेणेत आलेल्या माहे ऑक्टोबर २०१३ चे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र. ९) कायम करणेत आलचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

मा.अध्यक्ष यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

| | |
|---|---|
| विषय क्र. ४ | मा. सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव<br>चौकाचे नामकरण करणेबाबत. |
| विषय क्र. ५ | मा. सुलभा उबाळे यांचा प्रस्ताव<br>समाज मंदिराचे नामकरण करणेबाबत. |
| विषय क्र. ६ | मा. अश्विनी मराठे (चिखले) यांचा प्रस्ताव<br>रस्त्याचे नामकरण करणेबाबत. |
| विषय क्र. ७ | मा. भारती फरांदे यांचा प्रस्ताव<br>ठराव क्र. १८२ दिनांक १४/८/२०१३ बाबत. |
| विषय क्र. ८ | मा. आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव<br>चौकाचे सुशोभीकरण करणेबाबत. |
| विषय क्र. ९ | मा. निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव<br>रोड डिव्हायडर बसविणेबाबत. |
| विषय क्र. १० | मा. निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव<br>रोड डिव्हायडर मध्ये शोभेची झाडे लावणे व डिव्हायडर मधील विद्युत पोलवरती व्हॉईट एल.ई.डी. लाईट बसविणेबाबत. |

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा. श्री. दत्तात्रय साने अनुमोदक: मा. श्री.नारायण बहिरवाडे

माजी नगरसेवक श्री.मारुती साहेबराव भापकर यांच्या मातोश्री श्रीम.कृष्णाबाई साहेबराव भापकर यांचे तसेच शिवसेना शाखाप्रमुख श्री भगवान वाल्हेकर यांच्या मातोश्री श्रीम.अनुसया धर्माजी वाल्हेकर यांचे नुकतेच निधन झालेने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

सदरची सूचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.

(उपस्थितांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २०१ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : १३/११/२०१३ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. वैशाली काळभोर | अनुमोदक | : मा. दत्तात्रय साने |

संदर्भ: मा. वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.२६ काळभोरनगर येथील स.नं. १३५ येथे नव्याने विकसीत करण्यात आलेल्या सांस्कृतीक भवनास "कै.नारायणशेठ विष्णू काळभोर सांस्कृतीक भवन" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत.

विषय क्र. १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २०२ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : १३/११/२०१३ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. सुरेश म्हेत्रे | अनुमोदक | : मा. नारायण बहिरवाडे |

संदर्भ: मा.सौ. वनिता एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.४ कृष्णानगर मध्ये म्हेत्रेवाडी येथे भूखंड क्रमांक ३ अ वर पूर्वी जी मनपा शाळा क्र. ९२ होती ती गतवर्षी नवीन ठिकाणी स्थलांतरीत झालेली आहे. त्यामुळे या मोकळया जागेत जुन्या इमारतीमधील चार खोल्यांमध्ये वैद्यकीय विभागाने मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेनुसार दवाखाना (OPD Centre) सुरू करण्याचा निर्णय घेतलेला आहे व त्यानुसार सद्यस्थितीमध्ये हे काम प्रगतीपथावर आहे. सदरचे दवाखान्याचे नामकरण "कै.भागिरथीबाई विष्णूदादा थोरात दवाखाना- म्हेत्रेवाडी/ कृष्णानगर" असे करणेस मान्यता देणेबाबत.

विषय क्र. २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २०३ | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : १३/११/२०१३ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. अविनाश टेकवडे | अनुमोदक | : मा. नारायण बहिरवाडे |

संदर्भ: मा. अविनाश टेकवडे यांचा प्रस्ताव

मोहननगर प्रभाग क्र.२६ येथील महानगरपालिकचे सांस्कृतीक भवनाचे काम पूर्ण झालेले असून या भवनास मा.श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांचे नाव देणेस मान्यता देणेबाबत.

विषय क्र. ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २०४ | विषय क्रमांक | : ४ |
| दिनांक | : १३/११/२०१३ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. शांताराम भालेकर | अनुमोदक | : मा. अजय सायकर |

संदर्भ: मा. सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव

कृष्णानगर मार्गे म्हेत्रेवाडी मुख्य रस्त्यास मिळणाऱ्या रस्त्याचे ठिकाणांस (गजानन म्हेत्रे उद्यानाजवळ) "म्हेत्रे चौक" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २०५ | विषय क्रमांक | : ५ |
| दिनांक | : १३/११/२०१३ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. सुलभा उबाळे | अनुमोदक | : मा. संगिता पवार |

संदर्भ: मा. सुलभा उबाळे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.११ सेक्टर २१ यमुनानगर मधील त्रिवेणीनगर चौकातील बांधलेल्या समाज मंदिरास हिंदूह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २०६ | विषय क्रमांक | : ६ |
| दिनांक | : १३/११/२०१३ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा.अश्विनी मराठे (चिखले) | अनुमोदक | : मा. वैशाली काळभोर |

संदर्भ: मा.अश्विनी मराठे (चिखले) यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण मधील साईनाथनगर येथे असणा-या रस्त्यास "कै.शिवाजी गणपत शेलार" यांचे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २०७ | विषय क्रमांक | : ७ |
| दिनांक | : १३/११/२०१३ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. भारती फरांदे | अनुमोदक | : मा. आर.एस.कुमार |

संदर्भ: मा. भारती फरांदे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.१४ मधील सेक्टर २६ येथील चौकाचे नामकरणाबाबतचे ठराव क्र. १८२ दिनांक १४/८/२०१३ मध्ये "शांताराम एल. भोंडवे" असा उल्लेख करण्यात आलेला होता. त्या ऐवजी "स्व.शांताराम लक्ष्मण भोंडवे, माजी मुख्य उद्यान अधिक्षक, पिं.चिं.म.न.पा" असे संबोधणेत यावे यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २०८ | विषय क्रमांक | : ८ |
| दिनांक | : १३/११/२०१३ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. आर.एस.कुमार | अनुमोदक | : मा. शुभांगी बो-हाडे |

संदर्भ: मा. आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव

फ्रेन्डस् क्लब ऑफ प्राधिकरण यांनी सेक्टर २५ चे मध्यभागी लालबहाद्दुरशास्त्री चौक या ठिकाणी सुशोभीकरण करण्यासंदर्भात विनंती पत्र दिले आहे असून सदर सुशोभीकरण त्यांचे स्वखर्चातून करणार आहेत. मा.शहर अभियंता यांचेकडून सुशोभीकरणाचे डिझाईन तयार करुन घेवून लालबहाद्दुरशास्त्री चौक या ठिकाणी सुशोभीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २०९ | विषय क्रमांक | : ९ |
| दिनांक | : १३/११/२०१३ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. निलेश पांढरकर | अनुमोदक | : मा. स्वाती साने |

संदर्भ: मा. निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.१६, आकुर्डी गावठाण येथे रोड डिव्हायडर बसविणेबाबत

१) गंगानगर ते सुभाष पांढरकर नगर पर्यंत.

२) म्हाळसाकांत चौक ते गणेशनगरी पर्यंत.

३) म्हाळसाकांत चौक ते गंगानगर रेल्वेलाईन पर्यंत.

४) आकुर्डी हॉस्पीटल ते शितळादेवी चौकापर्यंत

उपरोक्त ठिकाणी जुन्या पध्दतीचे रोड डिव्हायडर काढून नवीन पध्दतीचे रोड डिव्हायडर बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २१० | विषय क्रमांक | : १० |

| | | | |
|---|---|---|---|
| दिनांक | : १३/११/२०१३ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. निलेश पांढरकर | अनुमोदक | : मा. स्वाती साने |

संदर्भ: मा. निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.१६, आकुर्डी गावठाण येथील श्री.म्हाळसाकांत चौक ते खंडोबा मंदिर चौकापर्यंत नव्याने बसविलेल्या रोड डिव्हायडर मध्ये शोभेची झाडे लावणे तसेच डिव्हायडर मध्ये जे लाईटचे पोल उभे केले आहेत त्या पोलवरती व्हॉईट एल.ई.डी. लाईट बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

यानंतर मा.अध्यक्ष यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(श्री.जावेद शेख)
अध्यक्ष
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग समिती
अप्र/११/ कावि/ ४४१ /२०१३
दिनांक : ०७ /१२/२०१३

सही/-
प्रशासन अधिकारी
अ प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी ४४